पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-२०२२
'B++ Grade (CGPA २.९६)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११६ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ sus.ac.in ई-मेल : eligibility@sus.ac.in

पात्रता विभाग

जा.क्रं.पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२५-२६/7434 दिनांक: 20 SEP 2025

प्रति,
मा. प्राचार्य,
विद्यापीठाशी संलग्नित स्वायत्त महाविद्यालये.

**विषय:- स्वायत्त महाविद्यालयाची माहिती पोर्टलवर अपलोड करण्याबाबत व पदवी प्रमाणपत्र शुल्काबाबत.**

**संदर्भ:- १) दि.२५/०८/२०२५ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकेतील विषय क्र. ०८ नुसार स्वायत्त महाविद्यालयाच्या सुधारीत शुल्का बाबतचा ठराव.**

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की स्वायत्त महाविद्यालयाच्या शुल्काबाबत कोणती कार्यवाही करावी याबाबत व्यावस्थापन परिषदेमध्ये संदर्भ क्र.१ नुसार विषय सादर करण्यात आलेला होता. त्यामध्ये खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यासाठी प्रति विद्यार्थी प्रतिवर्ष रु.२००/- (रुपये दोनशे फक्त) शुल्क आकारण्यास व विद्यापीठाकडून स्वायत्त महाविद्यालयांना विहीत केलेल्या पदवी प्रमाणपत्र शुल्कापेक्षा रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त)ज्यादा शुल्क आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

वरील ठरावानुसार सर्व स्वायत्त महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून त्वरीत कार्यवाही करावी. व शुल्क भरल्याची माहिती पत्राद्वारे विद्यापीठास अवगत करण्यात यावी.

(डॉ.अतुल लकडे)
प्रभारी कुलसचिव